क्र. 4082/2017
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई -- ४०० ०१८.
दिनांक - 01 AUG 2017

**पहा - या कार्यालयाचे परिपत्रक क्र.४६९/२०१६ दि.१०/०८/२०१६**

**परिपत्रक क्र. ५०६ दिनांक** 01/08/2017

धर्मादाय संघटनेच्या सर्व प्रादेशिक व अधिनस्त जिल्हा कार्यालयातील निरीक्षकांना सुचित करण्यात येते की, कार्यरत नसलेल्या संस्था / न्यासांची नोंदणी रद्द करणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ (३ अ) आणि (३ ब) मध्ये यापूर्वीच सुधारणा करण्यात आली आहे.

सदर सुधारणेनुसार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे प्रभावी अंमलबजावणी करीता धर्मादाय संघटनेच्या अधिनस्त कार्यालयातील सर्व निरीक्षकांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त नमुद संदर्भीय परिपत्रकाचे अनुषंगाने कार्यरत नसलेल्या संस्थांची / न्यासांची (ज्यांचे मागील ५ वर्षाचे हिशेबपत्रके व बदल अर्ज सादर झालेले नाहीत) अशा न्यासांची विवरण पत्रांसह यादी बनवून संबंधित सहायक धर्मादाय आयुक्त/ धर्मादाय उप आयुक्त यांचेकडे प्रत्येक महिन्याच्या शेवटी सादर करावी. निरीक्षकांच्या या कामकाजावर संबंधित विभागीय कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी यांनी देखरेख ठेवावी. निरीक्षकांनी त्यांचा अहवाल संबंधीत सहायक धर्मादाय आयुक्तांकडे सादर करावा. सहायक धर्मादाय आयुक्तांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ (३ अ) प्रमाणे कार्यवाही करावी.

संबंधित परिपत्रकाचे अनुषंगाने धर्मादाय सह आयुक्त यांनी सदर कार्यवाहीची सातत्याने पहाणी करुन मासिक न्यायिक विवरण पत्रासोबत मुख्यालयास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत -

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. अधिनस्त कार्यालयातील सर्व निरिक्षक
५. कार्यालयीन परिपत्रक धारिणी